ePaper

# मुंबई, रायगडला रेड अलर्ट, पुण्यात ऑरेंज अलर्ट, राज्यात मुसळधार पावसाचा अंदाज




वर्ष - 8 । अंक - 305 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

www.mahaenews.com । शुक्रवार, दि. 13 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- ब्राझीलची पुन्हा विश्वचषकवारी!
- लॉर्ईसच्या मैदानावरील ‘किंग’!
- तो सेल्फी ठरला शेवटचा!
- संसार सुरु होण्याआधीच संपला!

ePaper
मुंबई, रायगडला रेड अलर्ट, पुण्यात ऑरेंज अलर्ट, राज्यात मुसळधार पावसाचा अंदाज
| वर्ष - 8 | अंक - 305 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज ™
www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 13 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



## आतील पानांत


- ब्राझीलची पुन्हा विश्वचषकवारी!
- लॉर्ड्सच्या मैदानावरील 'किंग'!
- तो सेल्फी ठरला शेवटचा!
- संसार सुरु होण्याआधीच संपला!


### शेतकऱ्यांना लवकरच कर्जमुक्ती : समिती स्थापन करणार : बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला यश

# बळीराजासाठी गुड न्यूज!

## देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही : कडू - बावनकुळे भेटीच्या वेळी मुख्यमंत्र्यांची घोषणा

। अमरावती / मुंबई । वृत्तसंस्था । महाईन्यूज

**महाराष्ट्रातील बळीराजाला लवकरच 'गुड न्यूज' मिळेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. 'प्रहार' संघटनेचे नेते बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला यश आले असून मुख्यमंत्र्यांनी मोठी घोषणा केली आहे. बच्चू कडू यांनी १७ मागण्यांसाठी आंदोलन केले होते.**



### कर्जमुक्तीसाठी समितीची स्थापना..

अमरावतीचे पालकमंत्री आणि राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बच्चू कडू यांच्या आंदोलनाच्या ठिकाणी भेट देऊन तेथून मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी बातचीत केली. त्यावेळी शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीच्या प्रश्नावर एक समिती स्थापन करण्याचे आश्वासन फडणवीस यांनी दिले. या समितीमध्ये बच्चू कडू यांचा समावेश असेल.

### कर्जमुक्तीचा गंभीर प्रश्न..

शेतकऱ्यांची कर्जमुक्ती हा गहन आणि गंभीर विषय आहे. तसेच कर्जमाफी करताना कोणत्या घटकाची कर्जमाफी करावी, याबाबत मोठी गुंतागुंतही आहे. त्यामुळे गरजू शेतकऱ्यांना कर्ज मुक्ती मिळावी, यासाठी समिती स्थापन करण्यात येणार आहे. या समितीच्या शिफारशीच्या अहवालावर कर्जमुक्तीचा निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती बावनकुळे यांनी दिली.

### बावनकुळे यांच्या मध्यस्थीला यश..

अमरावती जिल्ह्यात गुरुकुंज मोझरी येथे बावनकुळे यांनी बच्चू कडू यांच्या आंदोलनाला भेट दिली. यावेळी आमदार प्रताप अडसड, चंदू यावलकर, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, पोलीस आयुक्त अरविंद चावरिया हेदेखील उपस्थित होते.

### बळीराजाच्या भल्यासाठी..

प्रथम बच्चू कडू यांच्याशी चर्चा आणि नंतर फडणवीस यांच्याशी संपर्क साधल्यानंतर बावनकुळे म्हणाले, की बळीराजाला केंद्रस्थानी मानून सर्वतोपरी मदत करण्याचे धोरण राज्य शासनाने स्वीकारले आहे. त्यामुळे, शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचा निर्णय होणे गरजेचे आहे. याबाबत उच्च स्तरावर बैठकही घेण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचा निर्णय घेताना शेवटच्या घटकातील एकही शेतकरी सुटू नये, याची खबरदारी घेण्यात येणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### प्रश्न दिव्यांगांच्या अनुदानाचा..

बच्चू कडूंनी केलेल्या या अन्नत्याग आंदोलनात दिव्यांगांना देण्यात येणारे अनुदान वाढवावे, अशी महत्त्वाची मागणी आहे. येत्या पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागण्या सादर करून निर्णय घेण्यात येणार आहे. कोणत्याही योजनेत निधी देताना त्याची अर्थसंकल्पात तरतूद असणे गरजेचे आहे. यामुळे अपंगांचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

### शेतकऱ्यांच्या अन्य प्रश्नांबाबतही..

बळीराजासंदर्भात असलेल्या इतर प्रश्नांवर पशुसंवर्धन, जलसंधारण, महसूल, पणन आदी मंत्र्यांशी चर्चा झाली असून पुढील आठवड्यात यासंदर्भात बैठक घेऊन निर्णय घेण्यात येणार आहे. बच्चू कडू यांनी आंदोलनाच्या माध्यमातून मांडलेल्या सर्व मागण्यांबाबत शासन सकारात्मक आहे, असेही बावनकुळे म्हणाले.

### बच्चू कडू यांचे प्रस्ताव आणि सूचना महत्वाच्या!

कर्जमाफीसाठी स्थापन करण्यात येणाऱ्या समितीच्या बैठकांना बच्चू कडू यांना निमंत्रित करण्यात येईल. त्यांच्या सर्व सूचना आणि प्रस्तावांचा आग्रहपूर्वक समावेश केला जाईल. या समितीचा अहवाल सर्वांसाठी खुला राहील. त्यासोबतच येत्या खरीप हंगामासाठी कर्ज थकीत असलेल्या शेतकऱ्यांनाही कर्ज मिळणे गरजेचे आहे. या शेतकऱ्यांनाही नव्याने कर्ज मिळावे, यासाठीही मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात येईल, असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले आहेत.

### मुख्यमंत्र्यांशी दूरध्वनीवरुन चर्चा..

पालकमंत्री बावनकुळे यांनी बच्चू कडू यांना आवाहन केल्यानंतर आणि त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी चर्चा केल्यानंतर आंदोलन मागे घेण्यासंदर्भात कार्यकर्त्यांशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल, असे यावेळी बच्चू कडू यांनी जाहीर केले. दि. ८ जूनपासून 'प्रहार' संघटनेचे प्रमुख माजी आमदार बच्चू कडू शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह दिव्यांगांच्या प्रश्नांना घेऊन अन्नत्याग आंदोलनावर बसले आहे. आंदोलनाचा शुक्रवारी सहावा दिवस होता.

ePaper
| वर्ष - 8 । अंक - 305 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज ™
www.mahaenews.com । शुक्रवार, दि. 13 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## फडणवीसांचं आश्वासन, तरीही बच्चू कडू उपोषणावर ठाम!



### आतील पानांत


- ब्राझीलची पुन्हा विश्वचषकवारी!
- लॉर्ड्सच्या मैदानावरील 'किंग'!
- तो सेल्फी ठरला शेवटचा!
- संसार सुरु होण्याआधीच संपला!


## पालखी प्रस्थान सोहळा अवघ्या पाच दिवसांवर

# पालखी सोहळ्याची जय्यत तयारी!

## तुकोबांच्या पालखीचे 18 तर ज्ञानोबांच्या पालखीचे 19 जूनला प्रस्थान

। पिंपरी । वृत्तसंस्था । महाईन्यूज

**आषाढी वारीसाठी श्री संत तुकाराम महाराज आणि श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान सोहळा अवघ्या पाच दिवसांवर येऊन ठेपला आहे. या पार्श्वभूमीवर संस्थानने जय्यत तयारी केली आहे. पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या दिंडीतील वारकऱ्यांना पिण्याचे स्वच्छ पाणी, आरोग्य सेवांसह तंबूंची तयारी केली आहे. शिधा व साहित्याची खरेदीही झाली आहे. जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराज पालखी सोहळा येत्या १८ जूनला देहूतून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. तर, आळंदी येथून श्री संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी १९ जून रोजी पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. पालखी सोहळा अवघ्या पाच दिवसांवर आला असून, तयारी अंतिम टप्प्यात आली आहे.**






> चोवीस तास पिण्याचे पाणी पुरविण्याचे नियोजन केले आहे. धर्मशाळा आणि तंबूत राहणाऱ्या वारकऱ्यांसाठी अठरा टँकरद्वारे मागणीप्रमाणे पाणीपुरवठा केला जाईल. वारकऱ्यांच्या सुरक्षासाठी नगर परिषदेच्या वतीने शहरातील वर्दळीच्या आणि गर्दीच्या ठिकाणी १३० सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. सिद्धबेट, नदी घाट, नवीन पुलासह संपूर्ण महत्त्वाच्या ठिकाणांची स्वच्छता पूर्ण झाली आहे. वारी कालावधीत तीन पाळ्यांमध्ये साफसफाई केली जाणार आहे. फिरत्या शौचालयांची उपलब्धता केली आहे. दिवाबत्तीची कामे पूर्ण झाली आहेत.
>
> **-माधव खांडेकर,** मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद

देहूचे पालखी सोहळा प्रमुख गणेश महाराज मोरे म्हणाले, 'पालखी सोहळ्यातील चांदीचा रथ, अब्दागिरी यांना पॉलिश करण्यात आले आहे. पालखी सोहळ्यात रथापुढे २७ आणि रथामागे ३९० दिंड्या चालणार आहेत. सोहळ्यातील सर्व दिंडीप्रमुखांना संस्थानने पत्रव्यवहार केला आहे. पालखी मार्गावर भाविकांना विविध सोयीसुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी पाणी, आरोग्य, वीज, रस्ते विभागाला पत्रव्यवहार केला आहे. पालखी मार्गावरील अन्नदानासाठी लागणारे साहित्य खरेदी केले आहे. टाळ, मृदंग, पखवाज, वीणा व पूजेच्या साहित्याची खरेदी करण्यात आली आहे. मानकरी, सेवेकरी, दिंडीप्रमुखांना पत्र्यव्यवहार केला आहे. देऊळवाड्यातील स्वच्छतेसाठी कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून, सुरक्षारक्षकही तैनात करण्यात आले आहेत. भाविकांच्या सुरक्षिततेसाठी ३२ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत"

चोवीस तास पाणीपुरवठा, पिण्याच्या पाण्याचे बारा टँकर, पाच फिरत्या टँकरद्वारे पाणीपुरवठा, सुलभ स्वच्छतागृहे, जंतूनाशक औषधी, धूर फवारणी देहू नगरपंचायतीने केली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. किशोर यादव म्हणाले, 'पुरेसा औषधसाठा उपलब्ध आहे. उपचार केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्रात आंतर, बाह्य रुग्ण विभाग असणार आहे. रुग्णवाहिका उपलब्ध केल्या आहेत.'

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळाप्रमुख डॉ. भावार्थ देखणे म्हणाले, 'दरवर्षी सायंकाळी पाचच्या दरम्यान पालखीचे प्रस्थान होत असते. मात्र, यंदा प्रस्थान सोहळा गुरुवारी आल्याने परंपरेप्रमाणे नित्य गुरुवारची माउलींच्या पालखीची मंदिर प्रदक्षिणा आणि आरती झाल्याशिवाय पालखीचे प्रस्थान करता येणार नाही. पालखी प्रस्थान सोहळ्यास दिरंगाई होऊ साडेसात वाजता होईल. मानाच्या ४७ दिंड्यांना देऊळवाड्यात प्रवेश दिला जाणार आहे. रात्री आठनंतर पालखीचे प्रस्थान होईल. चांदीच्या रथाला पॉलिश करण्यात आले आहे. जिल्हा प्रशासन, दिंडीकरी, फडकरी, मानकरी, पोलीस यंत्रणा, गावकऱ्यांसमवेत बैठका झाल्या आहेत. आता प्रस्थान सोहळ्याची प्रतीक्षा आहे.

# सुविधा न देता कर कसा घेता?

## खासदार सुप्रिया सुळे यांचा राज्य सरकारला प्रश्न

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'लोकसभा, विधानसभा निवडणुकीपूर्वी महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या ३२ गावातील नागरिकांच्या मिळकत करवसुली करण्यास स्थगिती देण्यात आली आहे. आता निवडणुकीच्या निकालानंतर या गावांना वेगळा न्याय लावला जात असून, गावांकडून करवसुली करण्याची चर्चा सुरू आहे, हे योग्य नाही. या गावांमध्ये कोणत्याही सुविधा दिल्या जात नसताना कर कसला गोळा करता,' असा प्रश्न खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारला विचारला आहे.**

### गावांमध्ये कोणत्याही सुविधा दिल्या जात नसताना कर कसला गोळा करता



खासदार सुप्रिया सुळे यांनी शुक्रवारी महापालिकेत आयुक्त नवल किशोर राम यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. 'आमदार बापूसाहेब पठारे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्यासह इतर पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३२ गावांमधील मिळकतकराचा विषय महत्त्वाचा आहे. निवडणुकीपूर्वी वेगळा न्याय आणि निकाल लागल्यानंतर दुसरा न्याय लावणे योग्य नाही,' असे सुळे यांनी सांगितले. यावर राज्य सरकारने तातडीने निर्णय घेऊन या गावांना दिलासा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

'शहरातील रस्त्यांवर वाहतूक कोंडीची प्रश्न बिकट होत चालला आहे. गुरुवारी गंगाधाम चौकात अपघातात एका महिलेला जीव गमवावा लागला.

महापालिकेने आवश्यक त्या सुधारणा केल्या पाहिजेत. पाणी, रस्ते, तसेच महापालिकेच्या वतीने सुरू असलेल्या पावसाळापूर्वीच्या कामांचा आढावा आयुक्तांबरोबर झालेल्या चर्चेत घेण्यात आला,' असे खासदार सुळे यांनी सांगितले.

### 'प्रभाग रचना पारदर्शकपणे करावी'

'महापालिकेच्या निवडणुकीत प्रभागरचना करताना ती पारदर्शकपणे आणि सूत्राला धरून केली पाहिजे. कोण काय सांगत आहे यावरून प्रभाग रचना केली जाऊ नये,' अशी मागणी महापालिका आयुक्तांकडे केली. तसेच, 'संपूर्ण राज्यातील प्रभाग रचना पारदर्शक झाली पाहिजे,' असेही खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले.

### 'आसावरी जगदाळे हिला महापालिकेत नोकरी द्या'

'पहलगाम दहशतवादी हल्ल्यात ज्या नागरिकांची हत्या झाली त्यांच्या कुटुंबीयांना मदत मिळावी अशी मागणी होती. पुण्यातील संतोष जगदाळे यांची मुलगी आसावरी जगदाळे हिला महापालिकेत नोकरी मिळावी, अशी मागणी केली होती. ही मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्य केली आहे. पण, त्याची अंमलबजावणी झालेली नाही. ती करावी,' अशी मागणीही खासदार सुळे यांनी केली.

---

# अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे २१४ जणांचे मृत्यू

## तातडीने कारवाई करण्याचे पोलिस आयुक्तांनी दिले आदेश

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यात अवजड वाहनांच्या बेकायदेशीर वाहतुकीमुळे गेल्या अडीच वर्षांत २१४ जणांचा बळी गेला आहे, तर अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. वाहतूक पोलिसांनी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. गंगाधाम परिसरातील अनधिकृत गोदामांमुळे परिस्थिती अधिक गंभीर बनली असून, यावर तातडीने कारवाई करण्याचे आदेश पोलिस आयुक्तांनी दिले आहेत.**





शहरातील प्रमुख रस्त्यांवर अवजड वाहनांना दिवसा बंदी असूनही नियमबाह्य पद्धतीने धावणाऱ्या वाहनांमुळे गेल्या अडीच वर्षांत २१४ जणांना प्राण गमवावा लागला. यामध्ये १९२ जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यामुळे वाहतूक पोलिसांकडून कागदावर आखल्या जाणाऱ्या योजनांची प्रत्यक्षात काटेकोरपणे अंमलबजावणी होते की नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

गंगाधाम येथील आई माताजी चौकात ट्रकने दुचाकीस्वार महिलेला चिरडल्यानंतर पुन्हा एकदा शहरातील अवजड वाहनांच्या मुक्त संचाराचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. बुधवारी सकाळी मार्केट यार्ड येथील गंगाधाम चौकात सिग्नलने मार्गक्रमण करणाऱ्या सासू-सुनेला भरधाव ट्रकने चिरडल्याने महिला जागीच ठार झाली. अपघातानंतर संतप्त नागरिकांनी ट्रक चालकाच्या निष्काळजीपणावर; तसेच पोलिसांच्या हलगर्जीपणावर नाराजी व्यक्त केली. या पार्श्वभूमीवर शहरातील एकूण अपघात आणि अवजड वाहनांमुळे झालेल्या अपघातांचा आढावा घेतला. गेल्या अडीच वर्षांत शहरात अवजड वाहनांमुळे २०० प्राणांतिक अपघात घडले असून, त्यात २१४ जणांना जीव गमवावा लागला. याशिवाय १६४ गंभीर अपघातांमध्ये १९२ जण गंभीर जखमी झाले आहेत.

शहरातील औद्योगिक वसाहती, महामार्गालगतचे भाग, उपनगर आणि नव्याने विकसित होणाऱ्या वसाहती या भागांमध्ये ट्रक, डंपर, ट्रेलर, टँकर यांसारख्या अवजड वाहनांची ये-जा कायम सुरू असते. भरधाव वेग, चुकीचे पार्किंग, वाहतूक नियमांकडे सर्रास दुर्लक्ष आणि बेदरकार वाहनचालक यामुळे रस्ते मृत्यूचे सापळे ठरत आहेत. पोलिसांनी काही मार्ग आणि वेळांसाठी अवजड वाहनांना बंदी घातली असली, तरी प्रत्यक्षात ती अंमलात येताना दिसत नाही. नियमांना धाब्यावर बसवून ही वाहने शहरात मोकाट फिरतात. पोलिसांची कारवाई केवळ निवडक ठिकाणी आणि अपुरी असल्याचे चित्र आहे.

### अनधिकृत गोदामे ठरला कळीचा मुद्दा

गंगाधाम ते शत्रुंजय मंदिर रस्त्यावरील अनधिकृत गोदामांमुळे दिवसेंदिवस अवजड माल वाहतुकीचा त्रास वाढत आहे. त्यामुळे निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंडीने स्थानिक नागरिक हैराण झाले आहेत. या पार्श्वभूमीवर अनधिकृत गोदामांवर तत्काळ कारवाई करण्याचा आदेश पोलिस आयुक्तांनी दिला असून, महापालिका प्रशासनाशीही संपर्क साधला जाणार आहे.

## 30 जूनपर्यंत कर भरणा केल्यास सवलत

# मालमत्ता कर वसुलीसाठी सवलतींची बरसात!

### ऑनलाइन कर भरणा प्रणालीला पिंपरी चिंचवडकरांचा प्रतिसाद

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी ३० जून २०२५ पूर्वी मालमत्ता कर भरून महापालिकेकडून दिल्या जाणाऱ्या विविध सवलतींचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.**






नागरिकांनी महापालिकेच्या अधिकृत वेबसाइटवरून किंवा मोबाईल ॲपद्वारे ऑनलाइन कर भरल्यास, त्यांना थेट १० टक्क्यांपर्यंत कर सवलत दिली जात आहे. तसेच, महिलांच्या नावावर नोंद असलेल्या मालमत्तांवर ३० टक्क्यांपर्यंत करसवलत दिली जात असून, महिला सक्षमीकरणाच्या दिशेने महापालिकेचे हे महत्त्वपूर्ण पाऊल आहे. महापालिकेने पर्यावरणपूरक उपक्रम राबविणाऱ्या गृहनिर्माण संस्था, दिव्यांग व्यक्तींच्या नावावर असलेल्या मालमत्ता, तसेच महिलांच्या नावावर असलेल्या मालमत्तांना सामान्य करात सवलत देण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवडमधील मोठ्या प्रमाणावर नागरिक आणि विशेषतः महिला सवलतींचा लाभ घेण्यासाठी पुढे सरसावत आहेत. नागरिकांना जलद, पारदर्शक आणि लोकाभिमूख सेवा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी महापालिकेच्या कर संकलन विभागाने ऑनलाइन पद्धतीने 'मालमत्ता कर भरणा हस्तांतरण, थकबाकी नसल्याचा दाखला अशा प्रकारच्या सेवा दिल्या जात आहे.

दरम्यान, सध्या महापालिकेकडे थकीत मालमत्ता कराच्या रकमेत लक्षणीय वाढ झाली असून, यात १० हजार पुढील सुमारे ७६ हजार ६८८ मालमत्ताधारांकडे ४९८ कोटी रुपयांची थकबाकी आहे. या थकबाकीदार मालमत्ता धारकांना पालिकेच्या वतीने थकबाकीची बिलासोबतच जप्तीपूर्व नोटीस पाठविण्यात आली आहे.

वेळेवर कर न भरल्यास जप्तीची कारवाई करण्यात येणार असल्याचेही कर संकलन विभागाने स्पष्ट केले आहे.शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महापालिकेला आर्थिक स्रोताची आवश्यकता असून, नागरिकांनी वेळेत कर भरून विकास प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात येत आहे.

ऑनलाईन व्यवहारांमधूनच १८९.५२ कोटी रुपये जमा आतापर्यंत ऑनलाईन माध्यमातून कर भरणाऱ्या सुमारे १ लाख ८९ हजार ८२३ नागरिकांनी १० टक्के सवलतीचा लाभ घेतला असून, केवळ ऑनलाईन व्यवहारांमधूनच १८९.५२ कोटी रुपये जमा झाले आहेत.ऑनलाइन कर भरणा प्रणालीला पिंपरी चिंचवडकरांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

> "शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पायाभूत सुविधा उभारणी, स्वच्छता, रस्ते, पाणीपुरवठा यांसारख्या क्षेत्रात महापालिका सातत्याने काम करत आहे. यासाठी आवश्यक निधीचा एक महत्त्वाचा स्रोत म्हणजे मालमत्ता कर. नागरिकांनी वेळेत कर भरून महापालिकेच्या विकास प्रक्रियेत सहभागी व्हावे. ३० जूनपूर्वी कर भरणाऱ्यांना दिली जाणारी सवलत ही नागरिकांसाठी एक उत्तम संधी आहे.
>
> **-प्रदीप जांभळे पाटील,** अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

> "महापालिकेच्या वतीने करदात्यांना जलद, पारदर्शक आणि सुलभ सेवा देण्याचा आमचा प्रयत्न आहे. ऑनलाइन माध्यमातून कर भरल्यास १० टक्के सवलत, तसेच महिलांच्या नावावर असलेल्या मालमत्तांना ३० टक्क्यांपर्यंतच्या लोकाभिमूख सवलत योजना आहे.थकीत कर न भरल्यास मात्र नियमानुसार जप्तीची कारवाई होईल, याची नागरिकांनी नोंद घ्यावी.
>
> **-अविनाश शिंदे,** सहायक आयुक्त पिंपरी चिंचवड


## आई, मी फ्लाइटवर जातोय..." इरफानचा निरोप ठरला अखेरचा!

### अहमदाबाद विमान अपघातात पिंपरीच्या इरफान शेखचा मृत्यू; आईचा हंबरडा; शेजारी मित्रपरिवार सुन्न!

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड "आई, मी फ्लाइटवर जातोय... काळजी करू नकोस" तुझ्या तब्येतीची काळजी घे. मी पुन्हा फोन करतो... पिंपरीतील इरफान शेखचा आणि त्याच्या आईचा हा नेहमीचा संवाद. मात्र हा संवाद यावेळी अखेरचा ठरला.**







पिंपरीच्या संत तुकाराम नगर परिसरातील रहिवासी इरफान शेख (वय २२) गेल्या दोन वर्षांपासून विमान कंपनीत केबिन क्रू म्हणून कार्यरत होता. कामाचा एक भाग म्हणून तो देशभर फ्लाइट्समध्ये प्रवास करायचा. कोणतीही फ्लाइट असो, तो आईला आधी कळवायचा कोणता मार्ग, कोणती वेळ, कुठे उतरणार... असा त्यांचा संवाद ठरलेला असायचा. यावेळी इरफानचा नाही तर प्लेन क्रॅश झालेली बातमी आईला ऐकायला मिळाली आणि आईने एकच हंबरडा फोडला. शेजारी, मित्रपरिवार देखील या बातमीने सुन्न झाले आहेत. अहमदाबाद येथे घडलेल्या विमान अपघातात इरफानचाही मृत्यू झाल्याचे वृत्त समोर आले. ही बातमी समजताच त्याच्या आईने अक्षरशः हंबरडा फोडला. "माझा इरफान त्या फ्लाइटमध्ये होता!" असे त्या एकसारख्या बडबडत होत्या. इरफानच्या मृत्यूची बातमी समजताच संत तुकारामनगरमध्ये शोककळा पसरली. मृतदेहाची ओळख पटवण्यासाठी भावाचे डीएनए सँपल इरफानचे आई-वडील आता अहमदाबादला पोहोचले आहेत. अपघात इतका भीषण होता की मृतदेहांची ओळख पटवण्यासाठी डीएनए नमुने घेण्यात आले. इरफानच्या भावाचा सॅम्पल घेण्यात आला असून, तो जुळल्यावरच मृतदेह कुटुंबीयांच्या ताब्यात दिला जाणार असल्याची माहिती इरफानचे काका फिरोज शेख यांनी दिली.


#### बकरी ईदसाठी आला होता पिंपरीत

इरफान काही दिवसांपूर्वीच बकरी ईदसाठी तीन दिवसांची सुट्टी काढून घरी आला होता. घरात हसणं, खेळणं, आईसोबतचे गप्पाटप्पा अजूनही घरच्यांच्या डोळ्यासमोर आहेत. पण त्यानंतर तो परत निघून गेला. आता तर तो आमच्यातून कायमचा निघून गेला आहे ही बातमी मनाला पटणार नाही. असे त्यांच्या शेजाऱ्यांनी सांगितले. इरफानचे मित्र, शेजारी, नातेवाईक अजूनही धक्क्यात आहेत. फोनवरच्या शेवटच्या बोलण्याच्या आठवणी, त्याचे फोटो, आणि "आई, मी परत येतो..." हे त्याचे शब्द आता काळजात खोलवर घर करून राहिले आहेत. असे त्याचे कुटुंबीय सांगत आहेत.

#### शेख कुटुंबावर दु:खाचा डोंगर

इरफान ला नेहमी निसर्गरम्य ठिकाणी फिरायला आवडायचं, तो नेहमी म्हणायचा माझ्या आई- वडिलांना मी फिरायला घेऊन जाणार ही त्याची इच्छा अपुर्णच राहिली. प्रत्येक वेळी इरफान कुठलं ही विमान उड्डाण घेण्याआधी तो आईशी फोनद्वारे बोलायचा. काल तो काही मिनिटे आधी आई शी बोलला. इरफानचे आईवर खूप प्रेम होतं, अस त्याच्या काकांनी सांगितलं आहे. या घटनेनंतर शेख कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने »



### प्रपंच हे परमार्थाचे साधन.

फार दिवस नोकरी केली की माणसाच्या मनाला गुलामगिरीची सवय लागते; हे चांगले नाही. काही दिवस तरी माणसाने मालकी हक्काने रहायला शिकले पाहिजे. नोकरी करीत असतानाच अनुसंधानाचा अभ्यास करावा, म्हणजे पुढे नोकरी सुटल्यावर, जितका वेळ मिळेल तितका अनुसंधानात जाईल. प्रत्येक मनुष्य जन्माला आल्यापासून परमार्थाचा अभ्यास करतो आहे. प्रत्येक मनुष्याला आनंद किंवा समाधान हवे आहे, आणि त्यासाठी त्याची खटपट चालू असते. खरोखर, परमार्थाला दुसऱ्याची गरजच नाही; मग दुसरा कुणी आपला परमार्थ बिघडवील कसा ? जगात जे आहे ते सर्व चांगले आहे, आपणच तेवढे बरे नाही. दरवाजे, खिडक्या हे जसे घराचे साधन आहे किंवा आपल्या गावी जाण्यासाठी आगगाडी हे जसे साधन आहे, त्याप्रमाणे परमार्थ साधण्यासाठी किंवा परमात्म्याच्या प्राप्तीसाठी प्रपंच हे साधन आहे. नाहीतर नुसत्या प्रपंचामध्ये सुख नाही. प्रपंच हा इथून तिथपर्यंत सगळा सारखाच. गरिबाचा असो की अडाण्याचा असो, अधिकाऱ्याचा असो की कारकुनाचा असो, या देशातला असो की त्या देशातला असो, प्रपंचाचा धर्म जो उणेपणा, अपुरेपणा किंवा तात्पुरतेपणा, तो कधीही कुठेही बदलत नाही. म्हणून, जे आपल्यापाशी नाही ते ज्याच्यापाशी आहे त्याच्या प्रपंचाला पाहून आपण भुलून जाऊ नये. आहे त्यात समाधान ठेवावे. परमार्थात अधिकार कुणी कुणाला देऊन येत नसतो; आपला अधिकार आपल्या कृतीवर अवलंबून असतो. परमार्थाची जाणीव जेवढी दु:खात होते तेवढी सुखात असताना होत नाही. ते सुख शेवटी दु:खातच लोटते. ज्या जाणिवेने आपण सर्व ज्ञान मिळवतो, ती काय आहे हे जाणण्याचा कुणी प्रयत्न करीत नाही. वैषयिक बुद्धी विकारांना सामील झाली म्हणजे ते प्रबळ होऊन घातक ठरतात. अशा वेळी, मनात येईल तसे वागण्याचे टाळले तर विकार दुबळे होतात. मी विकारवश होत असेन, तर अखंड प्रेमयुक्त नामस्मरण करणे जरूर आहे. विकारांना वश न होता, प्रारब्धाने आलेले विषय भोगावे म्हणजे त्यांचे काही चालणार नाही.

थर्मामीटर ताप दाखवितो, घालवीत नाही. तद्वत् शास्त्रे आपले चुकते कुठे ते दाखवितात, काय करावे ते दाखवितात; पण करणे आपल्याकडेच आहे. समर्थांना राम दिसला, आम्हांला का दिसू नये ? तर आम्ही समर्थांप्रमाणे श्रद्धा ठेवून उपासना सतत आणि आदराने करीत नाही म्हणून. कसेही करा, पण मी रामाचा आहे ही भावना जागृत ठेवा. नाम जाणून, अजाणून, श्रद्धेने, अश्रद्धेने, कसेही घ्या, राम तुम्हाला अन्नवस्त्राला कमी करणार नाही हे खास ! नाम श्रद्धेने घेतले तर विशेषच फळ. म्हणून, अखंड नामात रंगून आनंदात राहू या.


**बोधवचन:- सुखाने प्रपंच करा पण त्यामध्ये भगवंताचे अनुसंधान ठेवा. हेच माझे तुम्हाला सांगणे आहे.**



**'स्टेट'मेंट**

**अधिकराव दिवे-पाटील**
संस्थापक, संपादक

# उद्धव ठाकरे झेल देवेंद्र; गोलंदाज राज ठाकरे!



**मुंबईमध्ये सुरू असलेल्या लुटूपुटूच्या क्रिकेट मॅचमध्ये राज ठाकरे यांनी बुमरास्टाईल टाकलेल्या एका अप्रतिम यॉर्करवर उद्धव ठाकरे यांनी उडवलेला कॅच देवेंद्र फडणवीस यांनी अलगद टिपला. उद्धव भोपळ्यावर परतले, त्यांचा भ्रमाचा भोपळा मात्र फुटला!**

### 'ताज' हॉटेल वरील ग्रेट-भेट..

ठाकरे बंधू एकत्र येणार आणि मुंबई ठाकरे ब्रँड जोरात चालून महानगरपालिकेची सत्ता मिळणार, अशी खुशीत गाजरे खाणार यांना राज आणि फडणवीस यांची भेट ही मोठी चपराकच होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची सुमारे तासभर 'ताज' हॉटेलमध्ये चर्चा झाली. राज ठाकरे हे फडणवीस यांच्या आधी आधी हॉटेलमध्ये पोहचले आणि फडणवीस यांच्यानंतर बाहेर पडले.

### पहिल्यांदा टाळी कोणाची?

याचा सरळ सरळ अर्थ राज ठाकरे यांनी टाळीसाठी देवेंद्र फडणवीस यांच्यापुढे हात केला होता आणि फडणवीस यांनी टाळी दिली. उद्धव ठाकरे यांच्याबरोबर जायला तयार असल्याचे यापूर्वी राज ठाकरे यांनी सांगितले होते, तर त्याच वेळी उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे यांचा हा प्रस्ताव मान्य असल्याचा निर्वाळा दिला होता. मात्र, उद्धव ठाकरे यांच्यातला भाऊबंदकीतला 'नको तो पीळ' बाहेर आला. राज ठाकरे यांनी कोणाशी बोलावे, काय करावे याचे मार्गदर्शन त्यांनी केले. राज ठाकरे यांनी त्यावर थेट प्रतिक्रिया दिली नाही. मात्र, बंधूंच्या मनोमीलनाच्या शिळ्या कढीला येणारा ऊत येऊ दिला.

### भैय्या राजा, बजायेगा बाजा..

वाढदिवसाच्या केवळ एक दिवस आधी राज यांनी असा काही झटका दिला, की उद्धवभैया यांच्या पुढे आता बाजा वाजवण्याशिवाय कोणताच पर्याय ठेवला नाही. पान का खराब झाले? घोडा का अडला आणि भाकरी का करपली याचे एकच उत्तर असते.. ते म्हणजे न फिरवल्याने आणि मुख्य म्हणजे, ती फिरवण्याची वेळ अचूक असावी लागते. आपल्याला वेळ झाला, मूड होता, सवड झाली, इच्छा आहे, दुसरे काही करण्यासारखे नाही, घरी झोपण्याचाही कंटाळा आला तर राजकारण आणि भाकरी फिरवता येत नाही.

### इथं घाई आहे कुणाला?

गेल्या महिन्यात दोघेही एकाचवेळी परदेशात होते आणि आराम करत होते. त्यावेळी बसून एकत्र येण्याचे ठरवले असते तर..पण, घाई कोणालाच नव्हती. ठाकरे नावाचा कथित ब्रँड सांभाळण्यात दोघेही व्यग्र होते. याचा फायदा देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. आता त्यांना शिव्याशाप देणारे, फडणवीस यांच्या या कृतीला चुकीचे ठरवणारे, त्यांच्यावर तुटून पडतील. मात्र, हातातून बाण निसटला आहे. लक्ष्यभेद करून झाला आहे. फडणवीस यांनी टाकलेला डाव हा चाणक्यनीतीचे उत्तम उदाहरण आणि गेमचेंजर ठरणार आहे हे नक्की!

### मनसेची वेगळी वाट..

ही भेट होताच मनसेचे नेते संदीप देशपांडे आणि अमेय खोपकर हे शिवसेनेचे मंत्री उदय सामंत यांना जाऊन भेटले. अर्थात् ही भेट कशासाठी, याची सारवासारव करण्यात आली. पण, राज्यातील जनता मूर्ख नाही. मांजराने डोळे मिटले आणि दूध पिले तर त्याला जग आपल्याला पाहात नाही असे वाटत असते. मात्र, जग ते समजून घेते. दूध कोण पीत आहे हे त्यांना समजत असते. देशपांडे आणि खोपकर यांनी सामंत यांची घेतलेली भेट किंवा काही दिवसांपूर्वी उदय सामंत यांनी राज ठाकरे यांची घेतलेली भेट. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राज ठाकरे यांचे सहभोजन, प्रीतिभोजन, याचे अन्वयार्थ पब्लिकला समजत नाहीत की काय?

### साहित्य, भाषा, संस्कृतीवर चर्चा?

नियम, अटी, शर्थी आणि देणीघेणी या पलीकडे सामंत म्हणतात तशी साहित्य, संगीत, चित्रकला, भाषा, संस्कृती यावर गप्पा मारायला ना राज ठाकरे यांना वेळ आहे, ना उदय सामंत यांना! राजकारण हा चोख व्यवहार आहे, हे राज ठाकरे यांना स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी नक्कीच शिकवले आहे. किंवा राज ठाकरे एकलव्याच्या निष्ठेने शिकले आहेत. साहित्य, संस्कृती आणि शिक्षणाच्या गप्पा मारायला माजी नगरसेवक ही आपल्या नेत्याकडे जात नाही, ही वस्तुस्थिती सगळ्यांना माहिती आहे. मग, ताक मागायला जाताना भांडे का लपवायचे, हे कळत नाही? 'महायुती' च्या बाजूने मनसे आली, तर भाजपला नक्कीच फायदा होणार आहे. किंबहुना, विरोधात लढले तरी फायदा होणार आहे.

### मराठी मतांचे विभाजन महत्त्वाचे..

मराठी मतांचे विभाजन हा मुंबई महानगरपालिका जिंकण्याचा सोपा मार्ग आहे. ठाकरे शिवसेना आणि मनसे जिथे जिथे लढतील तिथे फायदा भाजपचा होण्याची शक्यता आहे. बरं, मनसे जिंकले तरी मनसेचे इंजिन भाजपाच्या वळचणीलाच येऊन थांबणार यात शंका नाही. कॉंग्रेस आणि उबाठा यांना रोखण्यासाठी राज ठाकरे हा भाजपसाठीचा उपयोगी आणि हक्काचा नेता आहे. एकनाथ शिंदे यांना ज्या ठाणे, कल्याण, बदलापूर, मीरा-भाईंदर, वसई - विरार इत्यादी भागात रस आहे, तिथेही मनसे ही शिंदे शिवसेनेला मदत करणार यात शंका नाही. अटी, शर्थी मान्य झाल्यावर मनसे भाजपला बिनविरोध पाठिंबा देईल किंवा मैत्रीपूर्ण लढत देईल. थोडक्यात, भाजप, मनसे आणि शिंदे शिवसेना यांनी मुंबई आणि आजूबाजूच्या सगळ्या महापालिकेची जुळवणी, मांडवली, तोडपाणी, व्यवस्था केली असे म्हणायला काहीच हरकत नाही.

### लढण्यात आणि जिंकण्यात रस नाही..

दुसरा विचार केला तर तसेही राज ठाकरे यांना मुंबईशिवाय इतरत्र एक नाशिक, थोडे पुणे वगळता कुठेच लढावे आणि जिंकावे असा रस नाही. न लढता जे काही पदरी पडेल, ते पवित्र असते असा त्यांचा मतदारांना आजपर्यंतचा अनुभव आहे. राज्यातले त्यांचे कार्यकर्ते आणि नेते त्यांच्या अस्तित्वासाठी लढत असतात. राज ठाकरे हे केवळ त्यांचे नेते असतात. त्यांच्यासाठी लढणारे नेते नसतात.

### 'महाआघाडी' चे भवितव्य अंधारात..

थोडक्यात, महाआघाडीचे एकूण भवितव्य अवघड आहे. कॉंग्रेसला 'महा आघाडी' मधून बाहेर पडून आपला पक्ष खरोखर व्यवस्थित वाढवण्यास संधी आहे. पण, हे त्यांच्या लक्षात येणार कधी, चर्चा करणार कधी, कोण कोण करणार, दिल्लीत जाऊन पक्षश्रेष्ठींना पटवून देणार कधी.. हा खरा प्रश्न आहे. त्यांचे ही व्यूहरचना अमलात येईपर्यंत फडणवीस यांनी दुसरा डाव मांडलेला असतो आणि पहिला डाव खेळण्यापूर्वीच काँग्रेस चित्रपट झालेला असतो, हे आता नवे राहिलेले नाही !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.




# खुरट्या खेड्यांतील खडखडाट!

**गरिबीइतकाच आपल्याकडे उदात्तीकरण केला जाणारा विषय म्हणजे खेडी आणि तेथील राहणीमान. 'खेड्यामधले घर कौलारू...' अशा गाण्यांपासून ते तेथील कथित रम्य जीवनशैलीविषयी आपल्याकडे अनेकांस वरचेवर उमाळे दाटून येतात. हे असले उमाळेवीर राहणार शहरात, शहरी सुखसोयींचा उपभोग घेणार आणि खेड्यातील जगणे किती सुखाचे म्हणून उसासे सोडणार. या अशा दुटप्पींस लबाड साथ असते ती राजकारण्यांची.**



या राजकारण्यांची खेड्यातील आलिशान घरे, त्यांच्या फुलाफळांनी ओसंडून जाणाऱ्या बागा आणि त्यांची श्रीमंत जीवनशैली खेड्यातील जीवनाविषयीच्या गैरसमजात भर घालते. या अशा धनिकांचे वैध-अवैध मार्गाने पैसा ओरबाडण्याचे उद्योग शहरांत असतात आणि तेथे कमावलेली माया ग्रामीण भागातील शुष्क जमिनीत मुरवणे सोपे असते म्हणून ते खेड्यांत जात असतात. शिवाय वर गरीब शेतकरी म्हणून मिरवण्याची राजकीय सोय! हे असे 'मायावंत' वगळले तर खेड्यातील जगणे कमालीचे कष्टाचे आहे. ना पाण्याची सोय, मुंबई-पुण्यास अखंड वीज मिळावी म्हणून वेळीअवेळी खंडित होणारा वीजपुरवठा आणि मृत्यूशी सोयरीक असणाऱ्या भयाण वैद्यकीय सोयी. हे खेड्यातील वास्तव. त्यात सुधारणा होऊन बदल होण्याऐवजी दिवसेंदिवस ते अधिकाधिक दरिद्री कसे होत आहे याचे शास्त्रशुद्ध, संख्याधारित विश्लेषण अर्थतज्ज्ञ प्रा. नीरज हातेकर यांनी गेले दोन दिवस 'लोकसत्ता'तील लेखांतून केले. अभ्यासपूर्ण सादरीकरणाची रास्त दखल घेत त्यास धोरणात्मक प्रतिसाद देणाऱ्या संवेदनशील राज्यकर्त्यांचा काळ हा महाराष्ट्राचा इतिहास झाला. वर्तमान नव्हे. धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता, वि. म. दांडेकर अशांनी आर्थिक विसंवाद दाखवून द्यावा आणि राज्यकर्त्यांनी धोरणसुधारणा कराव्यात असे एकेकाळी याच महाराष्ट्रात घडत असे. ते तेव्हा तसे घडत असे याचे कारण त्या वेळी भ्रष्टाचारादी गैरव्यवहार अजिबातच नव्हते आणि सर्व काही संतसज्जन होते, असे नाही. त्या वेळी राज्यकर्त्यांच्या मनात व्यापक जनहित हा विचार प्राधान्याने असे आणि त्या दृष्टीने कोणी काही चांगले सुचवले तर त्याचे स्वागत होत असे. असो. सद्या:स्थितीत 'आलिया भोगासी...' म्हणत आपल्या वास्तवाची दखल घ्यायला हवी. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे 'विकास' या कल्पनेचे झालेले सार्वत्रिक विकृतीकरण. विकास म्हणजे भव्य प्रकल्प. विकास म्हणजे त्या प्रकल्पांची खर्च फुगवून घ्यावयाची कंत्राटे. विकास म्हणजे वाळू/ सिमेंट/ दगड/ पोलाद यांची मागणी वाढवणारे महारस्ते, विमानतळ, उड्डाणपूल वा असेच काही. विकासासाठी हे सर्व हवे याबाबत दुमत नाही. पण महारस्ते बांधून त्यावरून वाढत्या व्यापारउदिमाची सोय नसेल, विमान प्रवासाची ऐपत असणारे ग्राहक नसतील आणि उड्डाणपूल संपल्यावर तेथे तयार होणाऱ्या वाहतूक गर्दीचे काय याचा विचार नसेल तर अशा विकासातून केवळ कंत्राटदारांचेच आणि त्यांना कंत्राटे देणाऱ्यांचेच भले होते यात तिळमात्र शंका नाही. गेल्या महिन्यात एका पावसाने मुंबईचा विकास तुंबलेल्या रस्त्यावर उघडा पाडला. 'बुड बुड नगरीत बुडबुडे' या संपादकीयात 'लोकसत्ता'ने (२८ मे) त्यावर भाष्य केले. मुंबईसारख्या देशाच्या आर्थिक राजधानीची ही अवस्था असेल तर विपन्नावस्थेतील खेड्यांतील परिस्थिती किती गंभीर असेल याचा अंदाज बांधता येईल. मुंबईत अतिबांधकामामुळे पाणी मुरण्यास जागा नाही हे सत्य. पण ग्रामीण महाराष्ट्राचे काय? सांगली, कोल्हापूर, इकडे कोकण, उत्तर महाराष्ट्र, तिकडे विदर्भ आदी ठिकाणी ओसाड जमिनी असूनही पाणी आठ-आठ दिवस ओसरत नाही. या विरोधाभासाचा विचार आपण करणार की नाही? आज या आपल्या खेड्यास जोडणारे महामार्ग तयार झाले. छान. पण त्यामुळे त्या खेडेगावातील उत्पादकता वाढली काय? तेथील शेतकऱ्यांच्या उत्पादनास अधिक भाव मिळून त्यांच्या हाती चार पैसे खुळखुळू लागले अशी अवस्था आली का? या अतिरिक्त पैशांमुळे त्या गावांतील रहिवाशांची क्रयशक्ती सुधारून तेथील मागणी वाढली का? तसे झाल्याने या खेड्यांतून शहरांकडे धावणारे हताशांचे लोंढे कमी झाले का? यातील एकाही प्रश्नाचे उत्तर होकारार्थी देता येणार नाही. आज परिस्थिती इतकी भीषण आहे की आपल्या अनेक खेड्यांतील तरुणांच्या हातास काम मिळेल असा एकही उद्योग त्यांच्या गावांच्या आसपास नाही. परिणामी हे तरुणांचे तांडेच्या तांडे 'एमपीएससी' वा तत्सम सरकारी भरतीच्या परीक्षा देत बसतात आणि यश न आल्याने हताश होतात. या परीक्षांतील यशास मर्यादा आहेत. कारण शासकीय सेवेतील भरतीस मर्यादा आहेत. असे हे आपले उजाड वास्तव! केंद्र सरकारच्या आकडेवारीतूनच आणि अनेक सरकारमान्य विद्वानांच्या मांडणीतूनच ते समोर येत असल्याने त्यावर अविश्वास व्यक्त करण्याची चैन सत्ताधाऱ्यांस नाही.

## प्रासंगिक »

### जनअरण्य जोखताना...

***कार्यक्षम वयोगटातील सर्वाधिक लोकसंख्या असूनही ती प्रत्यक्षात उपयोगात येण्यासाठी पुरेशा संधीची वानवा हा आपला खरा प्रश्न. त्याचा अधिक जाच महिलांस होतो.***

संयुक्त राष्ट्रांचा 'स्टेट ऑफ वर्ल्ड पॉप्युलेशन' हा लोकसंख्येसंदर्भातील जागतिक अहवाल मंगळवारी प्रसिद्ध झाला. यंदाच्या एप्रिल महिन्यात भारताची लोकसंख्या १४६ कोटींहून पुढे गेल्याचे त्यातून दिसते. या अहवालानुसार पुढील ४० वर्षांत आपण आणखी २४ कोटींची भर घालू आणि मग मात्र भारताची लोकसंख्या आधी स्थिरावेल आणि त्यानंतर काही प्रमाणात कमी होईल. यातील 'लोकसंख्या कमी होईल' हा 'सरकारी पायाभूत सुविधांच्या कंत्राटांमुळे वाहतूक सुलभ होईल', या धर्तीचा केवळ आशावाद नाही. त्यामागे संख्याशास्त्राचा आधार आहे. तो म्हणजे देशाच्या सरासरी जननदरात झालेली घट. कोणी किती अपत्ये जन्मास घातली याचे प्रमाण 'एकूण जननदर' (टोटल फर्टिलिटी रेट, टीएफआर) या घटकावरून निश्चित करता येते. म्हणजे महिला दरडोई किती अपत्यांस जन्म देतात त्याचे प्रमाण. ते इतके दिवस २.१ होते. आता ते १.९ टक्के इतके कमी झाल्याचे हा अहवाल सांगतो.

'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारताच्या न्याय्य भूमिकेस पाश्चात्त्य देश, माध्यमे यांनी योग्य तो न्याय दिला नाही, अशी एक सर्वसाधारण भावना आपल्याकडे व्यक्त झाली. आपल्यावर दहशतवाद लादणाऱ्या पाकिस्तानला इतरांनी आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून जितके खडसावयाला हवे होते तितके त्यांनी केले नाही.

# राजनैतिक पर्यटनाचा हिशेब!



भारत-पाकिस्तान संघर्षात आपणच शस्त्रसंधी घडवून आणला असे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एकदा नव्हे तर तीन वा चार वेळा सांगून आपणावर अन्याय केला. सबब आपल्या सत्ताधीशांच्या मनात पाश्चात्त्य माध्यमे, विचारवंत, राज्यकर्ते इत्यादींबाबत एक अढी असते. म्हणून या सगळ्यांस आपण भीक का घालावी असा एक प्रश्न सतत आपल्या राज्यकर्त्यांकडून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे विचारला जात असतो. तो योग्य. पण तरी जगास आपली भूमिका समजावून सांगण्यासाठी सर्वपक्षीय खासदार शिष्टमंडळे पाठवण्याचा 'मास्टरस्ट्रोक' निर्णय आपल्या शासकांनी घेतला. त्यानुसार ५९ खासदार ३२ देशांची सैर करून आले. डेमॉक्रॅटिक रिपब्लिक ऑफ कांगो, सिएरा लिओन, लायबेरिया, गयाना, ब्राझील, पनामा, कोलंबिया, स्लोवेनिया, अल्जेरिया, बहारीन, इथियोपिया, डेन्मार्क आदींसह अमेरिका, जपान, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, इटली अशा देशांस या खासदार-मंडळांनी भेटी दिल्या. या दौऱ्यात या सर्वांनी मिळून ७२ निवेदने प्रसृत केली. खासगी क्षेत्रात जेव्हा एखाद्या कर्मचाऱ्यास कंपनीखर्चाने परदेशी पाठवले जाते तेव्हा आल्यावर त्याने काय साध्य केले त्याचा आढावा घेतला जातो. भारत सरकारही तितक्याच कार्यक्षमतेने काम करत असल्याने या दौऱ्यांचा जमाखर्च मांडण्याच्या प्रयत्नाचे स्वागतच होईल. तो मांडण्याआधी एक प्रश्न. एका बाजूने या परदेशीयांची पत्रास आपण ठेवायची गरजच काय, असे मत व्यक्त केले जात असताना त्यांच्या समोर आपण आपली बाजू मांडायला मुळात गेलोच का? यातील पाश्चात्त्य देश, विचारवंत, माध्यमे भारतद्वेष्टी आहेत, भारताची प्रगती त्यांस बघवत नाही, भारत मोठा झालेला त्यांस नको आहे इत्यादी इत्यादी भावना सत्ताधीशांठायी असताना 'आम्ही किती चांगले आणि पाकिस्तान किती वाईट' अशी स्वसमर्थनाची गरज आपणास का वाटावी? दुसरे असे की यातील कित्येक देशांचे प्रमुख हे आपल्या पंतप्रधानांचे जीवश्चकंठश्च मित्र तरी आहेत किंवा त्यांचे मोठे चाहते तरी आहेत. उदाहरणार्थ अनुक्रमे अमेरिका आणि इटली. असे असताना मित्रांसमोर आपली बाजू मांडण्याची आवश्यकता काय? बरे, ती आहे असे मानले तर निदान त्या देशाच्या सर्वोच्च नेत्यांनी-म्हणजे आपल्या पंतप्रधानांच्या मित्र/चाहत्यांनी- आपल्या शिष्टमंडळांचे स्वागत करून त्यांचे ऐकून घ्यायला हवे. तेव्हा अमेरिकेत अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इटलीत पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी आपल्या शिष्टमंडळांचे आदरातिथ्य करून त्यांस सन्मानाने वागवणे अपेक्षित होते. कारण ज्या प्रमाणे ट्रम्प आपल्या पंतप्रधानांचे मित्र आहेत त्याच प्रमाणे मेलोनी या आपल्या पंतप्रधानांच्या निस्सीम चाहत्या आहेत. तेव्हा या उभयतांकडून अशी अपेक्षा करणे गैर नाही. परंतु तसे झाल्याचे दिसत नाही. अमेरिकेत उपाध्यक्ष जेडी व्हान्स हे आपल्या शिष्टमंडळास भेटले आणि इटलीत तेथील प्रतिनिधीगृहाच्या फुटकळ समिती प्रमुखांपलीकडे कोणी अन्य आपल्या शिष्टमंडळास सामोरे गेल्याचे दिसत नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# अपघातावरून ठाकरेंनी व्यक्त केला संशय!

## बोईंग ड्रीमलायनर विमानांबाबत दिली महत्त्वाची माहिती

।मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अहमदाबादमध्ये एअर इंडियाच्या विमानाचा आज दुपारी अपघात झाला. एअर इंडियाचे बोईंग ७८७-८ या विमानाने दुपारी १.३८ मिनिटांनी उड्डाण घेतले. मात्र अवघ्या काही मिनिटांतच ते कोसळले. या अपघातानंतर भारतासह जगभरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. सर्वांनीच या अपघाताबद्दल दुःख व्यक्त केले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनीही एक्सवर पोस्ट शेअर करत मृतांना श्रद्धांजली व्यक्त केली आहे. पण यानिमित्ताने त्यांनी काही परखड सवालही उपस्थित केले आहेत.**





राज ठाकरे म्हणाले की, अहमदाबाद येथून लंडनला निघालेल्या विमानाचा अपघात झाला आणि त्यात अनेक प्रवासी आणि नागरिकांचा मृत्यू झाला. ही अतिशय दुःखद घटना आहे. या घटनेतील मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली. मृतांच्या कुटुंबियांच्या दुःखात महाराष्ट्र नवनिर्माण सेना सहभागी आहे. तसंच जखमी लवकरात लवकर बरे होऊ देत आणि सुखरूप घरी जाऊ देत हीच ईश्वरचरणी प्रार्थना.यानंतर त्यांनी अपघातग्रस्त बोईंग ड्रीमलाईनर या विमानाबद्दल काही प्रश्न उपस्थित केले आहेत. या कंपनीच्या अनेक विमानांचा जगभरात वारंवार अपघात होत असल्याकडे त्यांनी लक्ष वळविले आहे.तसेच आंतरराष्ट्रीय माध्यमात छापून आलेल्या बातम्यांचाही हवाला दिला आहे.राज ठाकरे म्हणाले, “विमान तंत्रज्ञानाबद्दल जरी मला खूप खोल माहिती नसली तरी माझ्या वाचनात काही गोष्टी याच्या आधी पण आल्या होत्या, त्यातून मला काही प्रश्न पडले. बोईंगच्या ‘ड्रीमलाईनर’ विमानाबद्दल खूप तक्रारी होत्या. २०१३ ला पहिल्यांदा जपान एअरलाईन्सच्या विमानाला आग लागली होती. त्यानंतर या विमानाबद्दल अनेक तक्रारी येतच होत्या. त्या इतक्या होत्या की २०२० ते २०२३ या काळात अनेकदा या विमानांच उड्डाण थांबवले गेले होते. जानेवारी २०१३ ला तर अमेरिकेपासून युरोपपर्यंत जवळपास सगळ्या मोठ्या विमान प्राधिकरणांनी जवळपास ३ महिने बोईंग ड्रीमलाईनरचं उड्डाण खंडित केले होते. आणि मला आठवतंय त्याप्रमाणे २०१३ ला भारतात डीजीसीएने देखील काही काळासाठी या विमानाचे उड्डाण खंडित केले होते.”जर ड्रीमलाईनर बद्दल इतक्या तक्रारी आहेत हे माहित असून सुद्धा आपण ही विमानं का वापरू देत होतो?आजच्या विमान अपघाताविषयी वाचताना अजून एक माहिती समोर आली ती म्हणजे हे विमान २८ जानेवारी २०१४ ला एअर इंडियाच्या सेवेत आले. थोडक्यात जगभरात जेंव्हा ड्रीमलाईनरबद्दल तक्रारी होत्या त्याच दरम्यान आपण हे विमान ताफ्यात आणले, असेही राज ठाकरे पुढे म्हणाले.राज ठाकरे पुढे म्हणाले की, ही वेळ हे सगळं बोलण्याची नाही असे म्हटले जाईल. जी घटना घडली ती दुःखद आहे पण म्हणून या विषयावर सरकारने आता तरी गांभीर्य दाखवायलाच हवं. ड्रीमलाईनर्स जर मृत्यूचा सापळा बनणार असतील तर कुठलाही राज ठाकरे म्हणाले की, अहमदाबाद येथून लंडनला निघालेल्या विमानाचा अपघात झाला आणि त्यात अनेक प्रवासी आणि नागरिकांचा मृत्यू झाला.

### ड्रीमलाईनर्सवर बंदी आणावी

ही अतिशय दुःखद घटना आहे. या घटनेतील मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली. मृतांच्या कुटुंबियांच्या दुःखात महाराष्ट्र नवनिर्माण सेना सहभागी आहे. तसंच जखमी लवकरात लवकर बरे होऊ देत आणि सुखरूप घरी जाऊ देत हीच ईश्वरचरणी प्रार्थना.यानंतर त्यांनी अपघातग्रस्त बोईंग ड्रीमलाईनर या विमानाबद्दल काही प्रश्न उपस्थित केले आहेत. या कंपनीच्या अनेक विमानांचा जगभरात वारंवार अपघात होत असल्याकडे त्यांनी लक्ष वळविले आहे. तसेच आंतरराष्ट्रीय माध्यमात छापून आलेल्या बातम्यांचाही हवाला दिला आहे.राज ठाकरे म्हणाले, “विमान तंत्रज्ञानाबद्दल जरी मला खूप खोल माहिती नसली तरी माझ्या वाचनात काही गोष्टी याच्या आधी पण आल्या होत्या, त्यातून मला काही प्रश्न पडले. बोईंगच्या ‘ड्रीमलाईनर’ विमानाबद्दल खूप तक्रारी होत्या.

## भाजप आणि शिवसेना शिंदे पक्षात धुसफुस

## गैरसमज होणार नाही याची काळजी घेतो : आशिष शेलार

।मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भाजप आणि शिवसेना शिंदे पक्षात धुसफुस आहे. सेनेचे काही मंत्री, आमदार माध्यमांवर सतत वेगवेगळी मतप्रदर्शने करत असतात. याविषयी चर्चा होत असते. हे आम्हाला माहीत आहे. मात्र आम्ही सरकार चालवताना नेहमी समन्वयाला प्राधान्य देतो आणि गैरसमज होणार नाही याची काळजी घेतो, अशी कबुली सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी दिली. शाहिरी महोत्सवाच्या समारोप कार्यक्रमासाठी सातार्‍यात आल्यानंतर शेलार माध्यमांशी बोलत होते.**



यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष व आमदार डॉ. अतुल भोसले. माजी आमदार डॉ. दिलीप येळगावकर, मदन भोसले, आमदार मनोज घोरपडे आदी उपस्थित होते. महायुतीतील दोन पक्षांमध्ये धुसफुस असल्याची कबुली देताना शेलार म्हणाले, की जरी सहकारी पक्षाकडून माध्यमांसमोर मतप्रदर्शने होत असतील तरीही आमची समन्वयाची भूमिका आहे. सातार्‍यात पाटण येथील सत्यजित पाटणकर यांना भाजप प्रवेश देत असताना पर्यटन व पालकमंत्री शंभूराज देसाई यांची कोंडी करण्याचा कोणताही विषय नाही. त्यांना पक्षप्रवेश देऊ नये म्हणून जर कोणी मुख्यमंत्र्यांना भेटले असेल तर यावर मुख्यमंत्रीच निर्णय घेतील. शंभूराज देसाई हे महायुतीतील अनुभवी नेते आहेत. आमच्यात गैरसमज होणार नाहीत याची चिंता आम्ही करतो, असे त्यांनी स्पष्ट केले. नितेश राणे यांच्या वक्तव्याबाबत बोलताना त्यांच्याशी मुख्यमंत्री बोलले आहेत. त्यामुळे याविषयी मी अधिक बोलू शकत नाही, असेही शेलार यांनी सांगितले.ठाकरे बंधू आणि दोन्ही पवारही एकत्र येणार आहेत, हे त्या दोघांनाही माहीत आहे का? अगोदर त्यांना एकत्र येण्याबाबत ठरवू द्या? सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या दोन्ही आघाड्या स्वतंत्र निवडणूक लढवणार की, एकत्र याबाबतचा निर्णय जिल्हाध्यक्ष अतुल भोसले घेतील. त्यांनी पक्षपातळीवर कळवल्यानंतर याबाबत कोअर कमिटी निर्णय घेईल.

### आमची समन्वयाची भूमिका


यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष व आमदार डॉ. अतुल भोसले. माजी आमदार डॉ. दिलीप येळगावकर, मदन भोसले, आमदार मनोज घोरपडे आदी उपस्थित होते.महायुतीतील दोन पक्षांमध्ये धुसफुस असल्याची कबुली देताना शेलार म्हणाले, की जरी सहकारी पक्षाकडून माध्यमांसमोर मतप्रदर्शने होत असतील तरीही आमची समन्वयाची भूमिका आहे. सातार्‍यात पाटण येथील सत्यजित पाटणकर यांना भाजप प्रवेश देत असताना पर्यटन व पालकमंत्री शंभूराज देसाई यांची कोंडी करण्याचा कोणताही विषय नाही. त्यांना पक्षप्रवेश देऊ नये म्हणून जर कोणी मुख्यमंत्र्यांना भेटले असेल तर यावर मुख्यमंत्रीच निर्णय घेतील. शंभूराज देसाई हे महायुतीतील अनुभवी नेते आहेत. आमच्यात गैरसमज होणार नाहीत याची चिंता आम्ही करतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

# तो सेल्फी ठरला शेवटचा!

## डॉक्टर दाम्पत्यासह तीन मुलांचा विमान अपघातात मृत्यू

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**अहमदाबादहून लंडन या ठिकाणी निघालेल्या विमानाचा काही मिनिटांतच भीषण अपघात झाला. टेक ऑफ नंतर ८०० फुटांच्या वर गेलेलं विमान कोसळलं आणि यातल्या प्रवाशांचा मृत्यू झाला. नेमका किती जणांचा मृत्यू झाला हे अद्याप स्पष्ट करण्यात आलेलं नाही. विमानात क्रू मेंबर्ससह एकूण २४२ जण होते त्यापैकी एक प्रवासी वाचला आहे अशी माहिती मिळते आहे.**



दरम्यान या अपघाताच्या करुण कहाण्या आता समोर येत आहेत. एका डॉक्टरचं कुटुंबही असंच संपलं आहे. त्यांनी या विमानात कुटुंबासह काढलेला सेल्फी शेवटचा ठरला आहे. त्यामुळे हळहळ व्यक्त होते आहे. डॉ. कोमी व्यास या उदयपूर येथील रुग्णालयात डॉक्टर म्हणून कार्यरत होत्या. त्यांनी त्यांची नोकरी सोडली आणि त्यांनी लंडन येथे त्यांच्या पतीसह प्रॅक्टिस करायचं ठरवलं. त्यांचे पती प्रतीक जोशी यांनीच पत्नी कोमी आणि तीन मुलांसह हा सेल्फी काढला.

विमान प्रवास सुरु होताना काढलेला हा सेल्फी आपल्या कुटुंबाचा अखेरचा सेल्फी ठरणार हे कुठे डॉक्टर प्रतीक जोशींना माहीत होतं? पण घडलं तेच. अहमदाबादहून विमानाने उड्डाण केलं आणि त्यानंतर काही मिनिटांतच विमान कोसळलं. या सेल्फीमध्ये डॉ. प्रतीक आणि त्यांची पत्नी कोमी शेजारी बसले आहेत. तर त्यांच्या मागे जी तीन मुलं दिसत आहेत ती या डॉक्टर दाम्पत्याची मुलं आहेत.

विमान अपघातात यांच्या पैकी कुणीही वाचलं नाही.डॉ. प्रतीक आणि कोमी व्यास हे दोघंही सुरुवातीला उदयपूर येथील रुग्णालयात कार्यरत होते. त्यानंतर प्रतीक हे लंडन येथे गेले आणि तिथे स्थायिक झाले. मागील आठवड्यात ते परतले होते. त्यानंतर कोमी यांनी इथल्या रुग्णालयातील नोकरीचा राजीनामा देऊन लंडनला स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. या दाम्पत्याला दोन जुळी मुलं आहेत आणि एक मुलगी आहे.

या सगळ्यांचा विमान अपघातात मृत्यू झाला.डॉ. प्रतीक जोशी यांचे वडील शहरातले प्रसिद्ध रेडिओलॉजिस्ट आहेत. तर कोमी यांचे वडील पब्लिक वर्क डिपार्टमेंटमध्ये अधिकारी आहेत. प्रतीक त्याची पत्नी कोमी आणि तीन मुलांना भेटण्यासाठी आठवडाभरापूर्वीच अहमदाबादला आला होता. त्यानंतर या त्या दोघांची चर्चा झाली आणि सगळ्या कुटुंबाने लंडनला स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. सगळे आता आम्हाला सोडून गेले असं प्रतीकचा भाऊ नयनने सांगितलं. एनडीटीव्हीने हे वृत्त दिलं आहे.अहमदाबादहून लंडन गॅटविकला जाणारं विमान एआय-१७१ उड्डाणानंतर तीन मिनिटांनी विमानतळाच्या सीमेजवळ कोसळलं.१.३८ वाजता उड्डाण केलेल्या बोइंग ७८७-८ विमानात २४२ प्रवासी आणि १२ क्रू सदस्य होते. त्यामध्ये १६९ भारतीय, ५३ ब्रिटिश, एक कॅनेडियन आणि ७ पोर्तुगीज नागरिक होते. अपघातात जखमी झालेल्या लोकांना जवळच्या रुग्णालयात नेण्यात आलं आहे.

### नेमकी घटना काय?

या घटनेबद्दल अधिक माहिती देण्यासाठी एअर इंडियाने 1800 5691 444 हा एक पॅसेंजर हॉटलाइन नंबर सुरू केला आहे. या घटनेची चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यांना व प्रवाशांच्या नातेवाईकांना एअर इंडियाकडून सहकार्य केलं जात आहे. एअर इंडिया त्यांच्या अधिकृत एक्स हँडलवर आणि वेबसाईटवर या घटनेशी संबंधित सर्व अपडेट्स व माहिती शेअर करत आहे. तसेच या घटनेचा शोक व्यक्त करण्यासाठी एअर इंडियाने त्यांच्या सोशल मीडिया पेजेसवरील प्रोफाइल फोटो हटवला आहे.दरम्यान या अपघाताच्या करुण कहाण्या आता समोर येत आहेत. एका डॉक्टरचं कुटुंबही असंच संपलं आहे.

# संसार सुरु होण्याआधीच संपला!

## खुशबूचा अपघातात मृत्यू, नवऱ्याला भेटण्याचं स्वप्न अधुरंच

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**अहमदाबादहून लंडन या ठिकाणी जाणाऱ्या विमानाचा टेक ऑफनंतर लगेचच अपघात झाला. हे विमान कोसळलं आणि अनेकांचा या घटनेत मृत्यू झाला. अनेकांची स्वप्नं आपला माणूस गेल्याने संपलीच. बोईंग 787-8 ड्रीमलायनर या विमानाने लंडनला जाण्यासाठी अहमदाबादच्या विमानतळावरुन उड्डाण घेतलं आणि पुढच्या पाच मिनिटांत अपघात झाला.**




बोईंग विमान ज्या ठिकाणी पडलं तिथे धुराचे लोट आणि आगीचे लोळ बराच काळ दिसत होते. तसंच एक भलामोठा आवाजही झाला. प्रत्यक्षदर्शींनी जेव्हा ही घटना पाहिली तेव्हा त्यांच्या काळजाचा थरकाप उडाला. दरम्यान या विमानात ज्यांचा मृत्यू झाला त्यांच्या अनेक करुण कहाण्या समोर येत आहेत. खुशबू नावाची एक नवविवाहिता याच विमानात होती. खुशबू मूळची राजस्थानच्या बलोतारा जिल्ह्यातली. तिचं लग्न याच वर्षी जानेवारी महिन्यात मनफुल सिंग याच्याशी झालं होतं. तिचा पती लंडनमध्ये शिकतो आहे. ती त्याला भेटण्यासाठी पहिल्यांदाच याच विमानाने लंडनला चालली होती. लग्नानंतर या दोघांची पहिल्यांदाच भेट होणार होती पण त्याआधीच खुशबूचा विमान अपघातात मृत्यू झाला.राजस्थानचे ११ जण या विमानात होते. त्यापैकीच एक खुशबूही होती. या ११ जणांपैकी दोघंजण हे शेफ म्हणून काम करण्यासाठी चालले होते. दुपारी १ वाजून ३८ मिनिटांनी विमानाचा अपघात झाला. वैमानिकाने थेट MAYDAY चा मेसेज दिला.त्यावेळी विमान ८०० फुटांहून अधिक उंचीवर पोहचलं होतं. त्यानंतर ते कोसळलं. याच अपघातात ज्या प्रवाशांचा मृत्यू झाला त्यात खुशबूचा समावेश होता. खुशबू मदन सिंग राजपुरोहित यांची मुलगी होती. ते मूळचे राजस्थानचे आहेत. जानेवारीत खुशबूचं लग्न झालं होतं. लग्नानंतर ती पहिल्यांदाच नवऱ्याला भेटायला चालली होती. मात्र तिचा मृत्यू झाला. ज्यामुळे तिच्या कुटुंबावर शोककळा पसरली आहे. एनडीटीव्हीने हे वृत्त दिलं आहे.

### अनेक मृतदेह जळून खाक

विमान अपघातामुळे मृतदेह जळून खाक झाले आहेत. अनेक मृतांची ओळख पटणं बाकी आहे. आता डीएनए टेस्टद्वारे मृतांची ओळख पटवली जाईल. मृत्यू झालेल्या प्रवाशांच्या नातेवाईकांना, कुटुंबीयांना बोलवून डीएनएद्वारे ओळख पटवली जाईल. गुजरातच्या आरोग्य सचिवांनी सांगितलं की अनेक मृतदेह असे आहेत ज्यांची ओळख पटवणं अगदीच कठीण झालं आहे. अहमदाबाद रुग्णालय, तसंच हॉस्टेल या ठिकाणी जे जखमी झाले त्यांना आम्ही रुग्णालयात आणलं आहे. त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.बोईंग विमान ज्या ठिकाणी पडलं तिथे धुराचे लोट आणि आगीचे लोळ बराच काळ दिसत होते. तसंच एक भलामोठा आवाजही झाला.

# मीरा जोशीने घेतलं नवीन घर!



मराठी मनोरंजन विश्वात अशा अनेक अभिनेत्री आहेत ज्यांनी स्वतःचं स्थान निर्माण केलंय. मराठी मनोरंजन विश्वातील अभिनेत्री प्राजक्ता माळीने काहीच दिवसांपुर्वी कर्जतला स्वतःचं नवीन घर घेतलं. आता प्राजक्ता नंतर आणखी एका मराठी अभिनेत्रीने स्वतःचं आलिशान घर घेतलंय. ही अभिनेत्री म्हणजे मीरा जोशी. मीरा जोशीने पुण्यात स्वतःचं घर विकत घेतलंय. मीराच्या नवीन घरातील गृहप्रवेशाचे फोटो व्हायरल झाले आहेत. मीराने सोशल मिडीयावर काही फोटो पोस्ट केलेत. या फोटोत मीराचा भाऊ सलील जोशी, आई स्मिता जोशी आणि तिचे बाबा दिसत आहेत. मीराने पुण्यातील नवीन घरात पुजा करत गृहप्रवेश केलाय. मीराच्या हातात कलश दिसुन येतोय. नवीन घर घेतल्याने मीरा आणि तिचं संपूर्ण कुटुंब खुप आनंदात आहे. मीरा काही दिवसांपुर्वी सोशल मिडियावर तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल चाहत्यांना माहिती दिली आहे. आपण प्रेमात पडल्याचं तिने सांगितलं आहे. तिने तिच्या बॉयफ्रेंडसोबतचे काही फोटोही शेअर केले होते. या फोटोत समुद्रकिनाऱ्यावर उभे आहेत. तर तिचा बॉयफ्रेंड पाठमोरा उभा आहे. तिने त्याचा चेहरा दाखवला नसल्याने तो नेमका कोण आहे याची उत्सुकता सगळ्यांनाच लागून राहिली आहे. मीराने उरण समुद्रकिनाऱ्यावरचे फोटो शेअर केले आहेत. तिने तिच्या प्रियकराचा चेहरा आणि नाव गुदस्त्यात ठेवलं असलं तरी चाहते तिच्यासाठी प्रचंड आनंदी आहेत. अभिनेत्री ऋतुजा बागवे, मेघना एरंडे अशा अभिनेत्रींनी मीराचं अभिनंदन केलंय. मीराने ही उत्तम अभिनेत्री आणि डान्सर आहे. अभिनेत्री मीरा जोशी हिचा मुंबई पुणे द्रुतगती मार्गावार अपघात झाला आहे. या संदर्भात अभिनेत्रीने स्वतः सोशल मिडियावर पोस्ट सह शेयर करत माहिती दिली आहे.

या अपघातात अभिनेत्रीला फारशी इजा झाली नसली तरी तिच्या गाडीचे मात्र मोठे नुकसान झाले आहे. तिची गाडी दुभाजकावर धडकल्याने गाडीला जबर फटका बसला आहे. अभिनेत्रीने गाडीचे काही फोटो आणि एक व्हिडिओ शेयर करत या अपघताची माहिती दिली .आहे.

# समृद्धीची सेटवरची पोस्ट



'स्टार प्रवाह' वाहिनी लवकरच एक नवी मालिका प्रेक्षकांसाठी घेऊन येत आहे. या मालिकेत अभिनेत्री समृद्धी केळकर व अभिनेता अभिषेक रहाळकर मुख्य भूमिकेत झळकणार आहेत. 'हळद रुसली कुंकू हसलं' असं या मालिकेचं नाव आहे. यामधून समृद्धी व अभिषेक पहिल्यांदाच एकत्र काम करत आहेत. दोघांनीही यापूर्वी 'स्टार प्रवाह' मालिकांमध्ये काम केलं आहे.

'हळद रुसली कुंकू हसलं' या मालिकेचा तीन दिवसांपूर्वी 'स्टार प्रवाह'ने सोशल मीडिया पेजवरून पहिला प्रोमो शेअर केला होता. या प्रोमोला 'ती अस्सल गावरान, तो पक्का शहरी' असं कॅप्शन देण्यात आलं होतं. 'स्टार प्रवाह'ने शेअर केलेल्या प्रोमोमधून अभिषेक हा शहरातून आलेला मुलगा तर समृद्धी ही गावा खेड्यातील मुलगी असते, असं काहीचं चित्र पाहायला मिळतं. परंतु, या प्रोमोमधील अजून एका गोष्टीने सर्वाचं लक्ष वेधलं, ती म्हणजे समृद्धीसह असलेली तिची गाय. समृद्धीचं तिच्या गायीसह घट्ट नातं असून ती तिची मैत्रीण असते, जिचं नाव स्वाती असं असल्याचं प्रोमोमधून पाहायला मिळतं. अशातच आता अभिनेत्रीने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टला तिने 'मी आणि माझी स्वाती' असं कॅप्शन दिलं आहे आणि कसा वाटला प्रोमो, असा प्रश्नही तिने तिच्या चाहत्यांना विचारला आहे.समृद्धी व अभिषेक या मालिकेसाठी कोल्हापुरात शूटिंग करत आहेत.

# जान्हवीलाच ठरवलं 'महामूर्ख



लक्ष्मी निवास' मालिकेतील जयंत-जान्हवीची जोडी कायम चर्चेत असते. संशयी व विकृत स्वभावामुळे जयंतला नेहमीच ट्रोल केलं जातं. लग्नाआधी जयंत कायम जान्हवीशी प्रेमाने वागताना दिसायचा. पण, त्याच्या प्रेमामागे लपलेली विकृती, त्याचा विक्षिप्त स्वभाव हळुहळू जान्हवीसमोर येत आहे.लग्नानंतर पहिल्याच दिवशी जयंतने जान्हवीसमोर झुरळ खाल्लेलं असतं. याशिवाय जरा काही चूक केल्यास तो जान्हवीला भयंकर शिक्षा देत असतो. यामुळे जान्हवीने एकदा जयंतचं घर सोडून जाण्याचा प्रयत्न देखील केला होता. पण, शेवटी लग्न, प्रेम हा सगळा विचार करून ती घर परत येते. आताही जयंतच्या मनात जान्हवी अन् मॅंडच्या ( विश्वा ) नात्याबद्दल संशय असतो. पण, 'मॅंड' नेमका कोण आहे? हे जयंतला माहिती नसतं. आता जयंत जान्हवीची नवीन परीक्षा घेणार आहे.जान्हवी वटपौर्णिमेचं व्रत करणार असते. यासाठी ती आदल्यादिवशी सगळी तयारी करून ठेवते. पण, विकृत जयंत एक मोठी खेळी खेळणार आहे. जान्हवी नवऱ्याला झोपेतून जागं करण्याचा प्रयत्न करत असते. पण, जयंत काही केल्या प्रतिसाद देत नसतो. कारण, हाच जयंतचा मूळ प्लॅन असतो. जान्हवी आपल्याला वाचवण्यासाठी काय-काय करू शकते हे त्याला पाहायचं असतं.

# नाटकाचा प्रयोग सुरु असताना गर्भपात झाला

अभिनेत्री सुरभी भावेने 'भाग्य दिले तू मला', 'स्वामिनी' या मालिकांमध्ये काम करत स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली. आता सध्या 'तू ही रे माझा मितवा' या मालिकेत ती वल्लरी ही भूमिका साकारत आहे. अभिनेत्री सोशल मीडियाद्वारे चाहत्यांच्या संपर्कात असते. अनेकदा ती तिच्या भावना व्यक्त करतानादेखील दिसते. आता एका मुलाखतीत अभिनेत्रीने तिच्या खासगी तसेच अभिनयातील प्रवासाबद्दल वक्तव्य केले आहे. याबरोबरच, नाटकाच्या प्रयोगादरम्यान गर्भपात झाल्याचा खुलासा तिने केला आहे.सुरभी भावेने 'मराठी मनोरंजन विश्व'ला मुलाखत दिली. या मुलाखतीत अभिनेत्री म्हणाली, "मी कधीच वाईट मार्ग अवलंबून कधीच कुठलीच कामं मिळवली नाहीत आणि इथून पुढे मिळवणारही नाही. माझी माझ्या कामावर प्रचंड श्रद्धा आहे. यामुळेच माझी मुलगी तीन महिन्यांची झाल्यानंतर मी कामाला सुरुवात केली होती.



ती ज्या दिवशी तीन महिन्यांची झाली, त्या दिवशी मी सेटवर होते."अभिनेत्री असेही म्हणाली की, ती कामाला प्राधान्य देते. सुरभी म्हणाली, "जेव्हा मी गरोदर होते, तेव्हा मला अनेक लोकांनी असं सांगून घाबरवलं होतं की आता पाच वर्षांचा गॅप येणार. पण, मला पाच महिनेही गप्प बसायचं नाही, कारण मला कामाची सवय होती. यामध्ये माझ्या पतीने मला साथ दिली. घरच्यांनी पाठिंबा दिला." सुरभी भावे एक प्रसंग सांगत म्हणाली, "पहिल्या मुलीनंतर पुन्हा गरोदर होते. माझा नाटकाचा प्रयोग सुरू होता आणि त्या चालू नाटकाच्या प्रयोगात माझा गर्भपात झाला होता. पण, त्याही वेळेला मी कधी थांबले नाही किंवा अतिशयोक्ती केली नाही. माझं असं म्हणणं होतं की जे व्हायचं आहे, ते घडून गेलं आहे, प्रयोग थांबवण्यात काही अर्थ नाही. तेव्हाही माझ्या नाटकातील सहकलाकारांनी मला खूप पाठिंबा दिला. 'सागरा प्राण तळमळला' नावाचं नाटक होतं. त्यामध्ये संध्या म्हात्रे, अंगद मस्कर ही सगळी मंडळी होती. जेव्हा त्यांना याबद्दल कळलं तेव्हा तो सगळ्यांसाठीच भावूक क्षण होता. त्यानंतर मी दवाखान्यात गेले. पुन्हा दुसऱ्या दिवशी शूटिंगला गेले होते", अशी आठवण सुरभीने सांगितली आहे.

# ब्राझीलची पुन्हा विश्वचषकवारी!

## पॅराग्वेवर विजय मिळवून 2026च्या स्पर्धेसाठी पात्रता

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**व्हिनिशियस ज्युनियरच्या निर्णायक गोलच्या जोरावर घरच्या मैदानावर झालेल्या पात्रता फेरीतील सामन्यात पॅराग्वेचा १-० असा पराभव करून ब्राझीलने पुढील वर्षी होणाऱ्या विश्वचषक फुटबॉल स्पर्धेतील प्रवेश निश्चित केला. १९३० सालापासून आतापर्यंत प्रत्येक विश्वचषकात खेळणारा ब्राझील हा एकमेव देश ठरला आहे. नवे प्रशिक्षक कार्लो अँन्चेलॉटी यांच्या मार्गदर्शनाखाली ब्राझीलने पहिलाच विजय मिळवला.**



बचावात्मक खेळामुळे ब्राझीलला इक्वेडोरविरुद्ध गोलशून्य बरोबरीवर समाधान मानावे लागले होते. पॅराग्वेविरुद्ध मात्र अँन्चेलॉटी यांनी ब्राझीलच्या नैसर्गिक आक्रमकतेला पूर्ण वाव दिला. पुनरागमनवीर राफिन्हाने पॅराग्वेच्या बचाव फळीसमोर अनेक समस्या निर्माण केल्या. पॅराग्वेने व्हिनिशियसवर अधिक लक्ष केंद्रित केले होते. यानंतरही माथियस कुनयाच्या पासवर ४४व्या मिनिटाला व्हिनिशियसने हलकासा स्पर्श करत चेंडूला गोलजाळीची दिशा दिली आणि सामन्यातील एकमेव गोल केला. दक्षिण अमेरिका गटातील अन्य सामन्यात इक्वेडोरने पेरू संघाला गोलशून्य बरोबरीत रोखून विश्वचषक स्पर्धेसाठी पात्रता सिद्ध केली. कोलंबियाविरुद्ध १-१ अशा बरोबरीवर समाधान मानावे लागलेल्या गतविजेत्या अर्जेंटिनाने यापूर्वीच पात्रता मिळवली आहे. उरुग्वेने घरच्या मैदानावर व्हेनेझुएलाचा २-० असा पराभव केला. त्यांना पात्रतेसाठी एका गुणाची आवश्यकता आहे. इक्वेडोर आणि ब्राझील दोघांचे २५ गुण असून, विजयांच्या आधारे इक्वेडोर दुसऱ्या, तर ब्राझील तिसऱ्या स्थानावर आहे. दोन्ही संघ आघाडीवरील अर्जेंटिनापेक्षा १० गुणांनी मागे आहेत. पात्रता फेरीचे दोन सामने शिल्लक आहेत.दक्षिण अमेरिका गटातून चिलीला पात्रता सिद्ध करण्यात अपयश आले. बोलव्हियाविरुद्ध त्यांना ०-२ असा पराभव पत्करावा लागला. त्यामुळे चिली संघ सलग तिसऱ्यांदा विश्वचषकासाठी पात्र ठरू शकला नाही. या अपयशानंतर मुख्य प्रशिक्षक रिकोर्डो गॅरेका यांनी पदाचा राजीनामा दिला. चिलीने २०१५ आणि २०१६ मध्ये कोपा अमेरिका स्पर्धेचे विजेतेपद मिळवले होते. मात्र, नंतर ते विश्वचषक स्पर्धेसाठी पात्र ठरू शकले नाहीत.

### ब्राझील दोघांचे 25 गुण

दक्षिण अमेरिका गटातील अन्य सामन्यात इक्वेडोरने पेरू संघाला गोलशून्य बरोबरीत रोखून विश्वचषक स्पर्धेसाठी पात्रता सिद्ध केली. कोलंबियाविरुद्ध १-१ अशा बरोबरीवर समाधान मानावे लागलेल्या गतविजेत्या अर्जेंटिनाने यापूर्वीच पात्रता मिळवली आहे. उरुग्वेने घरच्या मैदानावर व्हेनेझुएलाचा २-० असा पराभव केला. त्यांना पात्रतेसाठी एका गुणाची आवश्यकता आहे. इक्वेडोर आणि ब्राझील दोघांचे २५ गुण असून, विजयांच्या आधारे इक्वेडोर दुसऱ्या, तर ब्राझील तिसऱ्या स्थानावर आहे. दोन्ही संघ आघाडीवरील अर्जेंटिनापेक्षा १० गुणांनी मागे आहेत. पात्रता फेरीचे दोन सामने शिल्लक आहेत.दक्षिण अमेरिका गटातून चिलीला पात्रता सिद्ध करण्यात अपयश आले. बोलव्हियाविरुद्ध त्यांना ०-२ असा पराभव पत्करावा लागला. त्यामुळे चिली संघ सलग तिसऱ्यांदा विश्वचषकासाठी पात्र ठरू शकला नाही. इक्वेडोर आणि ब्राझील दोघांचे २५ गुण असून, विजयांच्या आधारे इक्वेडोर दुसऱ्या, तर ब्राझील तिसऱ्या स्थानावर आहे.

"इतके मोठे अपयश कधीच पाहिले नाही. चिलीच्या चाहत्यांनी आम्हाला माफ करावे," अशी भावना अनुभवी खेळाडू अॅलेक्सिस सँचेझने व्यक्त केली. बचावात्मक खेळामुळे ब्राझीलला इक्वेडोरविरुद्ध गोलशून्य बरोबरीवर समाधान मानावे लागले होते. पॅराग्वेविरुद्ध मात्र अँन्चेलॉटी यांनी ब्राझीलच्या नैसर्गिक आक्रमकतेला पूर्ण वाव दिला. पुनरागमनवीर राफिन्हाने पॅराग्वेच्या बचाव फळीसमोर अनेक समस्या निर्माण केल्या. पॅराग्वेने व्हिनिशियसवर अधिक लक्ष केंद्रित केले होते. यानंतरही माथियस कुनयाच्या पासवर ४४व्या मिनिटाला व्हिनिशियसने हलकासा स्पर्श करत चेंडूला गोलजाळीची दिशा दिली आणि सामन्यातील एकमेव गोल केला.

# लॉर्ड्सच्या मैदानावरील 'किंग'!

## 6 विकेट्स घेत पॅट कमिन्सने मोडून काढले 'हे' मोठे रेकॉर्ड्स

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेतील अंतिम सामना दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही संघांमध्ये सुरू आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सने दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांना चांगलाच घाम फोडला. पहिल्या दिवशी, दक्षिण आफ्रिकेची फलंदाजी गडबडली होती. मात्र, दुसऱ्या दिवशी टेंबा बावुमा आणि बेडिंघम या जोडीने दक्षिण आफ्रिकेला कमबॅक करून दिलं.**

मात्र, पॅट कमिन्सने ६ विकेट्स घेत दक्षिण आफ्रिकेचा संपूर्ण डाव अवघ्या १३८ धावांवर आटोपला आहे.हा सामना ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्ससाठी ऐतिहासिक ठरला आहे. या डावात गोलंदाजी करताना त्याने दक्षिण आफ्रिकेच्या ६ फलंदाजांना पॅव्हेलियनची वाट दाखवली. यादरम्यान त्याने आपल्या कसोटी कारकिर्दीत ३०० गडी बाद करण्याचा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. हा रेकॉर्ड त्याने आपल्या ६८ व्या कसोटी सामन्यात करून दाखवला आहे. यादरम्यान त्याने १४ वेळेस ५ एकाच डावात ५ गडी बाद करण्याचा कारनामा केला आहे. ऑस्ट्रेलियासाठी ३०० गडी बाद करणारा तो चौथा सर्वात वेगवान गोलंदाज ठरला आहे.




पॅट कमिन्सने २०११ मध्ये कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केलं होतं. पदार्पणात गोलंदाजी करताना त्याने ५ गडी बाद करण्याचा कारनामा केला होता. त्यानंतर दुखापतीमुळे ६ वर्ष त्याला कसोटी क्रिकेटपासून दूर राहावं लागलं होतं. हे ६ वर्ष वाया गेले नसते, तर त्याने आणखी विकेट्स घेऊन कसोटी क्रिकेटमधील मोठे रेकॉर्ड मोडून काढले असते.यासह पॅट कमिन्सच्या नावे आणखी एका मोठ्या रेकॉर्डची नोंद झाली आहे. त्याने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेत सर्वाधिक गडी बाद करणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत जसप्रीत बुमराहला मागे सोडलं आहे. जसप्रीत बुमराहच्या नावे या हंगामात ७७ गडी बाद करण्याची नोंद आहे. आता पॅट कमिन्सने त्याला मागे सोडलं आहे. कमिन्सच्या नावे ७९ गडी बाद करण्याची नोंद आहे.या सामन्यातील पहिल्या डावात ऑस्ट्रेलियाचा संपूर्ण डाव अवघ्या २१२ धावांवर आटोपला. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या दक्षिण आफ्रिकेला अवघ्या १३८ धावा करता आल्या. दक्षिण आफ्रिकेकडून फलंदाजी करताना बेडिंघमने सर्वाधिक ४५ धावांची खेळी केली. तर कर्णधार टेंबा बावुमाने ३५ धावांची खेळी केली.मात्र, पॅट कमिन्सने ६ विकेट्स घेत दक्षिण आफ्रिकेचा संपूर्ण डाव अवघ्या १३८ धावांवर आटोपला आहे.हा सामना ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्ससाठी ऐतिहासिक ठरला आहे.

### 300 गडी बाद करण्याचा रेकॉर्ड

या डावात गोलंदाजी करताना त्याने दक्षिण आफ्रिकेच्या ६ फलंदाजांना पॅव्हेलियनची वाट दाखवली. यादरम्यान त्याने आपल्या कसोटी कारकिर्दीत ३०० गडी बाद करण्याचा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. हा रेकॉर्ड त्याने आपल्या ६८ व्या कसोटी सामन्यात करून दाखवला आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

ePaper

। शनिवार।

। दि. 14 जून 2025।




Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org

CERTIFICATION COURSE BY MORAYA SHIKSHAN SANSTHA, CHINCHWAD



शिक्षणाबरोबरच सुसंस्कारित व्यक्तिमत्त्व घडविणारी शाळा

2025-26 ADMISSIONS OPEN

प्रज्वलितो ज्ञानमयो प्रदीपः

"यत् भावो – तत् भवति"

मोरया शिक्षण संस्था. चिंचवड
डिप्लोमा इन मॉन्टेसरी आणि नर्सरी शिक्षक प्रशिक्षण






* राष्ट्रीय स्तरावर वैध प्रमाणपत्र
* प्रात्यक्षिकवर भर,
* ग्रंथालय सुविधा
* अध्यापन शास्त्राबद्दलची माहिती
* बाल मानसशास्त्र व पोषण आणि खूप काही..

* शुल्क: १६,०००/- (२ हप्त्यांसह)
* १ सेमिस्टर कोर्स
* अभ्यासक्रम कालावधी: १५ जून २०२५ ते १५ डिसेंबर २०२५
* वेळ : सकाळी १० ते दुपारी २

प्लॉट क्र. 13, मोरया कॉलनी, सुदर्शन नगर, गोलांडे राम मंदिरासमोर, चिंचवड, पुणे 33

संपर्क
सुचित्रा आपटे - ९३२५१३२४०२
भाग्यश्री पंडित - ८०८७७०६१००




95277 64646 / 77967 67292